**<u>न्यायालय अवमान याचिका क्रं.११/२०२४</u>**

**<u>निशाणी क्रं.यु-९ वर आदेश</u>**

१) अर्जदारांनी प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला असुन असे प्रतिपादन केले आहे की, त्यांच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २ हयांचे नाव मदनसिंग तुराबसिंग राजपुत असे नमुद आहे त्याऐवजी चंदनसिंग सुरतसिंग राजपुत हे नाव नमुद होणे आवश्यक आहे आणि त्याकरीता दुरुस्ती करणे गरजेचे आहे. प्रस्तुतचे दुरुस्ती करण्यास संमती मिळाल्यास प्रतिवादींची कोणतीही हानी होणार नाही तसेच न्यायालय आदेश अवमान तक्रार ही या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेर जाणार नाही. त्यामुळे अर्ज मंजुर करण्यात येवुन दुरुस्तीची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती करतात.

२) प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जावर जोरदार हरकत नोंदवुन असे स्पष्ट केले आहे की, मुळातच या स्थितीला अर्ज पुर्णपणे चुकीचा ठरतो जो कायदेशीर दृष्टया योग्यही नाही. प्रतिवादी हयांनी दि. ११/०३/२०२५ रोजी प्रकरण खारीज करावे, नावात चुक असल्याबाबत अर्ज दिला होता, त्यामुळे अर्जदाराने चुक दुरुस्ती करण्याकरीता सदरचा अर्ज दिलेला आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी हयांनी हरकत घेतल्यानंतर सदरचा अर्ज दिलेला आहे, जो कायदयाच्या विरुध्द आहे म्हणुन हा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो.

३) दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर आणि कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते कि, प्रतिवादींच्या युक्तीवादा मध्ये पुर्णपणे तथ्य आहे की, प्रतिवादी हयांनी नि. सी-५ खाली अर्ज दाखल

केल्यानंतर ज्यामध्ये दि. १२/०३/२०२५ रोजी चंदनसिंह राजपुत हयांचे नाव वगळण्यात येत आहे असा आदेश पारीत झालेला आहे. त्यामुळे आता परत चंदनसिंह सुरजसिंह राजपुत हे नाव दुरुस्तीद्वारे या प्रकरणात समाविष्ट करणे हे या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेर आहे. त्यामुळे खालील आदेशान्वये प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज पुर्णपणे फेटाळण्यात येत आहे.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2025.08.21 11:20:57 +0530

**दिनांक :- २०/०८/२०२५** **(शार्दुल श. जहागिरदार)**

**न्यायाधीश,**

**ठिकाण :- बुलढाणा** **कामगार न्यायालय, बुलढाणा**